तालुक्यातील TOP 10 यशस्वी महिला उद्योजकांच्या

# यशोगाथा



उमेद अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे. यातून ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना पाठबळ मिळते आहे.

अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये मोठ्या स्वरूपाचे उद्योग व्यवसाय महिलांनी उभारले आहेत. यातून ग्रामीण भागातील महिला पुढे येत आहेत, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. उमेद अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या अशा उपक्रमांना जिल्हा परिषद, अहिल्यानगर नेहमी पाठबळ देण्याचे काम करेल.

-आशिष येरेकर (IAS)

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यादनगर

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | सुनिता सुधीर लांडे मु . पो . लोणी खुर्द ,तालुका. राहाता ,जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | स्वामी समर्थ महिला स्वयं सहाय्यता समूह (**आवळा कॅन्डी**) |
| उमेद कडून आर्थिक मदत | 2021 मध्ये PMFME अंतर्गत १६ लाख रुपये व्यवसाय कर्ज मिळाले. |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | श्री स्वामी समर्थ महिला बचत गट लोणी खुर्द या ठिकाणी स्थापन केला असून सुरुवातीला इतर बचत गटाप्रमाणे अभियानाच्या नियमाप्रमाणे बचतीचं काम करत होता. परंतु बचत गटांनी व्यावसायिक दृष्टिकोन जपावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विविध प्रकारचे प्रशिक्षण, चर्चासत्र यातून प्रेरणा घेत २०२१ मध्ये आवळा प्रक्रिया या वर काम सुरू केले.माजी जि .प .अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील यांनी जिल्हास्तरीय साई ज्योती प्रदर्शनाचे आयोजन केले. यामध्ये मी सहभाग घेत प्रथमच आपली आवळा कॅन्डी हा स्टॉल मध्ये विक्रीसाठी ठेवली. एका दिवसात पाच ते सहा हजार रुपयांचा व्यवसाय करत मी पहिल्याच प्रदर्शनामध्ये सहभाग घेऊन पंधरा ते वीस हजार रुपये मिळवले. या विक्रीतून मला फायदा झाल्या मुळे आवळ्या वर विविध प्रकारची प्रक्रिया करून त्यांनी व्यवसाय मध्ये आज मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे . या उद्योगातून माझ्या कडे बचत गटातीलच **सात** ते आठ महिला या बाराही महिने काम करत आहे. |

| | |
|---|---|
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | जिद्द चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर आपण यशस्वी उद्योजक होऊ शकतो, असा स्वतःवर असलेला विश्वास . आज या व्यवसायातून ते वर्षाकाठी २-५ लाख रुपयांची उलाढाल मी करत आहे याशिवाय मी सक्षमरित्या उभा राहून व्यवसाय मध्ये वाढ करत आहे. **नुकताच मला देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चव्हान, जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ.शालीनीताई विखे पाटील यांच्या उपस्थितीमध्ये लखपती दीदी म्हणून माझा सन्मान करण्यात आला आहे .** |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानाने माझ्या मध्ये आत्मविश्वासाची वृद्धी करूण मला नवीन दिशा दिली, आणि मी एक स्त्री असून नुसते चूल आणि मूल एवढेच माझे जीवन नसून मला समाजात एक व्यवसाय च्या स्वरुपात मी एक आदर्श उद्योजीका म्हणून माझी ओळख निर्माण झाली आहे उमेद अभियान हे माझ्यासाठी वरदान ठरलेले आहे<br>याचे संपूर्ण श्रेय **# उमेद अभियान यांना जाते #** |










पुण्य नगरी

# बचत गटाच्या सुनिता लांडे ठरल्या लखपती दिदी

**राहाता :** जिद्द, चिकाटी आणि कष्टाची तयारी असेल तर आपण यशस्वी उद्योजक होऊ शकतो. यासाठी गरज आहे ती चांगल्या मार्गदर्शनाची. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास आपल्या व्यवसायाला उंच भरारी घेता येते आणि अशीच भरारी लोणी खुर्द येथील श्री स्वामी समर्थ बचत गटाच्या अध्यक्षा सुनीता सुधीर लांडे यांनी आपल्या आवळा प्रक्रिया उद्योगातून घेत त्यांनी आपली यशोगाथा तयार केली आहे. त्या स्वताःही आत्मनिर्भर झाल्या आणि आपल्या गटातील महिलांना देखील त्यांनी सक्षम करत स्वतः त्या लखपती दिदी ठरल्या आहे.

नुकताच त्यांना देशाचे कृषीमंत्री शिवराज सिंह चौव्हान, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांच्या उपस्थितीमध्ये लखपती दिदी म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जनसेवा फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा

## जनसेवा फौंडेशनने बनविले आत्मनिर्भर

राहाता : कृषीमंत्री शिवराज सिंह चौव्हान यांनी लखपती दिदी म्हणून सुनिता लांडे यांचा सन्मान केला आहे. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील आदी.

धनश्रीताई विखे पाटील यांच्या प्रयत्नातून लोणी खुर्द या ठिकाणी श्री स्वामी समर्थ महिला बचत गट सुरू केला. सुरुवातीला इतर बचत गटाप्रमाणे बचतीचे काम सुरु होते. परंतु बचत गटांनी व्यावसायिक दृष्टिकोन जपावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून विविध प्रकारचे प्रशिक्षण, चर्चासत्र याशिवाय सहलीचा आयोजन केले. यातून प्रेरणा घेत सुनीता लांडे यांनी आवळा प्रक्रियावर काम सुरू केले.

२००५ मध्ये जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी जिल्हास्तरीय साई ज्योती प्रदर्शनाचा आयोजन केले. यामध्ये सुनीता लांडे यांनीही सहभाग घेत प्रथमच आपली आवळा कॅन्डी स्टॉलमध्ये विक्रीसाठी ठेवली. एका दिवसात पाच ते सहा हजार रुपयांचा व्यवसाय करत त्यांनी पहिल्याच प्रदर्शनामध्ये सहभाग घेऊन पंधरा ते वीस हजार रुपये मिळवले. खर्च वजा जाता दहा ते बारा हजार फायदा झाला. पैसा हातात आला आणि व्यवसायाला मोठी भरारी घेत या माध्यमातून आता थांबायचे नाही, काम करत राहायचे हा संदेश त्यांनी घेत बचत गटाच्या माध्यमातून प्रवरा परिसरामध्ये विविध उपक्रम बचत गटातून सुरू केले. यासाठी जनसेवा फौंडेशनच्या प्रकल्प संचालिका रुपाली लोढे, कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथील शास्त्रज्ज्ञ, उमेदचे अधिकारी यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले.

### प्रक्रिया उद्योगातून बचत गटातील सात ते आठ महिलांना बारमाही काम

आवळा प्रक्रिया वरतीच आपल्याला विविध पदार्थ तयार करायचे हा सुनिता लांडे यांचा ध्यास याच माध्यमातून त्यांनी वेळोवेळी जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून ठिकठिकाणी प्रशिक्षण घेऊन आवळा कॅन्डी, आवळा ज्यूस, आवळा सरबत, आवळ्याचे एक ना अनेक पदार्थ त्यांनी तयार केले आणि यातून उभे राहिले ते आवळा प्रक्रिया उद्योग. आज प्रक्रिया उद्योगातून त्यांच्याकडे बचत गटातीलच सात ते आठ महिला या बाराही महिने काम करत आहे. बचत गटाच्या माध्यमातून उभा राहिलेला हा व्यवसाय त्यांच्यासाठी मोठी उभारी देणारा ठरला. पतीच्या निधनानंतर तर हा व्यवसाय त्यांच्यासाठी सर्वकाही ठरला. या माध्यमातून त्यांनी मुलांना उच्च शिक्षण तर दिलेच परंतु अनेक महिलांना त्यांनी आधार दिला. आज या व्यवसायातून ते वर्षाकाठी लाखो रुपयांची उलाढाल करतात. याशिवाय त्या सक्षमरित्या सुनिता लांडे उभ्या राहिल्या आहेत.

Shrirampur Edition
Jan 10, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | पार्वती रवींद्र बनगया दाड बू तालुका -राहाता जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | आशा महिला स्वयं सहाय्यता समूह **(टोपी बनवणे )** |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँक कर्ज 3 लाख रु . |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | मी अभियाना मध्ये CRP या पदावर ३ वर्षापासून काम करत आहे .सदरील व्यवसाय 2023 रोजी सुरू केला या व्यवसाय साठी जवळ पास 2 लाख रु गुंतणूक करून मी ५ शिलाई मशीन खरेदी केल्या आहे. |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | मी हा व्यवसाय समूहातील महिला एकत्र करून सुरू केलेला असून ह्या मध्ये सर्व महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास खूप मदत झाली आहे . ह्या माध्यमातून एकूण पणे वार्षिक 2 ते 2.5 लाखा पर्यंत उलाढाल होते .ह्या मध्ये सर्वात महत्वाची बाब ही आहे की आमच्या यूनिट ला मा .मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रकल्प संचालक व जिल्हा अभियान व्यवस्थापक या सर्व मान्यवरांनी भेट देऊन आमच्या कामास अजून गाव स्तरावर उंचीवर नेण्यास मदत झाली आहे . या माध्यमातून आज 25-30 महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानाने मला एक नवीन दिशा व माझ्या पंखाणा बळ देण्याचे काम केले , मी उमेद अभियानाचे खूप खूप आभारी आहे. |

नवराष्ट्र

# सरकार बचत गटांच्या पाठीशी

## डॉ. आशिष येरेकर; आशा महिला गटाचे काम कौतुकास्पद



लोणी, (वा.) शासन हे बचत गटांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. केवळ बचत न करता व्यवसाय निर्माण करावेत. यासाठी लागणारे प्रशिक्षण उपलब्ध केले जाईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आशिष येरेकर यांनी केले. दाढ बुद्रुक येथील महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू असलेल्या उद्योगास भेट देवून त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून सुरू असलेल्या महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाचे कौतुक केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी समर्थ शेवाळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा उपअभियंता साळवे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप, तालुका अभियान व्यवस्थापक अमोल खांडेभराड, तालुका व्यवस्थापक प्रवीण बारेकर, प्रभाग समन्वयक राणी साळवे, तात्यासाहेब सातपुते, नकुल तांबे, ग्रामविकास अधिकारी संजय गिऱ्हे, भाऊराव तांबे तसेच बचत गटाच्या पार्वती रवींद्र बनगैय्या, अर्चना गाडेकर, रोहिणी राऊत, संगिता सातपुते, अर्चना पर्वत या उपस्थित होत्या.

### बचत गटातील महिलांशी संवाद

दाढ बुद्रुक येथील आशा महिला स्वयंसहायता समूह गटाच्या माध्यमातून सुरू असलेल्या टोपी बनविण्याच्या व्यवसायास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट देऊन बचत गटातील महिलांशी संवाद साधला. व्यवसायास लागणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता, एक टोपी बनविण्यास लागणारा वेळ, त्यातून मिळणारे उत्पन्न, टोप्या बनविल्यानंतर विक्रीसाठीची यंत्रणा या सर्व बाबींची माहिती येरेकर यांनी घेतली महिलांचे कौतुक केले.

### उत्पन्नातून मुलांचे शिक्षण

बचत गटात कार्यरत असलेल्या महिलांनी या व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपले घर चालविण्यास मोठी मदत झाल्याचे नमूद करून मुलांचे शिक्षणही या माध्यमातून झाल्याचे मोठ्या अभिमानाने सांगितले. याशिवाय जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनीताई विखे पाटील यांचे वेळोवेळी होणारे मार्गदर्शन ही महत्वपुर्ण ठरत असते. ग्रामीण भागातील महिलांसाठी असेच उद्योग सुरू करून त्यांना आधार देण्याचे काम करण्याच्या सूचना डॉ. येरेकर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

Ahmednagar Plus Edition Edition
Sep 10, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com





| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | सुनीता दयानंद ओहोळ , लोहगांव तालुका - राहाता जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | साई द्वारका माई स्वयं सहाय्यता समूह ( **अगरबत्ती** ) |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँक कर्ज 1 लाख रु. , CIF- 60,000 रु . |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | बचत गटामध्ये आल्यानंतर विविध व्यवसायांचे माहिती झाली व आपणही व्यवसाय चालू करावा असे मनामध्ये आले आणि अगरबत्ती बनवणे हा व्यवसाय निवडला, |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | गावातील शेतकरी गटाच्या व महिला बचत गटाच्या मीटिंगा घेऊन माहिती दिली व गाव पातळीवर तसेच तालुका पातळीवर मला ऑर्डर मिळा लागली . आज माझे उत्पन्न जवळ जवळ 5-6 लाख रु आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | व्यवसाय उभारण्याची इच्छा तसेच उमेद अभियानने दिलेली संधी यामुळे मी स्वतःची उपजीविका निर्माण केली आहे. मी खूप खूप आभारी आहे . |


साई
द्वारकामाई
साई धुनि


The Blessing Box
are authentically made from
natural flowers directly




LAVENDER

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | हसीन मेहबूब नाकेदार पुणतांबा तालुका - राहाता जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | जन्नत महिला बचत गट . **(लोकरीच्या वस्तु – शोभेच्या वस्तु )** |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF 15000, बँक कर्ज 1 लाख |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | सन 2022 मध्ये बचत गटाची स्थापना केली व व्यवसाय काय करावा हा विचार सतत डोक्यात चालायचं, पण आपण म्हणतो ना स्वतःवर विश्वास असला की कोणताही व्यवसाय आपण सुरू करू शकतो . मी यू टुब् वर वेगवेगळे व्यवसाय सर्च करणे चालू केले त्यातून मायक्रोन च्या वस्तू बनवणे हा व्यवसाय चालू केला . |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | या व्यवसायाला हळूहळू गती प्राप्त झाली , ऑर्डर मिळू लागल्या यामधून माझी उपजीविका निर्माण झाली आणि माझी वार्षिक उत्पन्न एक ते दोन लाखापर्यंत मला मिळाले . आज माझ्याकडे चार बचत गटातील महिला काम करतात. |
| उमेद अभियानाबाबत मत | मला सार्थ अभिमान वाटत आहे की मी उमेद अभियानाशी जोडल्या गेल्यामुळे मला स्व :चे अस्तित्व निर्माण करता आले . मी अभिया नाची मनस्वी आभारी आहे . |



| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | अनिता संजय घोगरे , लोणी , तालुका - राहाता जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | साई श्रमिक महिला स्वयं सहाय्यता समूह **(हळद )** |
| उमेद कडून आर्थिक मदत | RF 30000 , बँक कर्ज 2 लाख |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | 2018 पासून आम्ही शेतामद्धे हळद लागवड करणे सुरू केले , मी बचत गटामद्धे असताना व्यवसाय बद्दल माहिती घेणे सुरू होते , तालुका कृषि कार्यालयात बेट दिल्या नंतर कळले की हळदीवर विविध प्रकारचे प्रक्रिया करून आपण हळद पाउडर हा व्यवसाय चालू केला . त्या साठी पुणे येथे प्रशिक्षण घेऊन , मशनरी खरेदी करण्यासाठी 1 लाख रु खर्च आला . |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | गावातील शेतकरी गटाच्या व महिला बचत गटाच्या मीटिंगा घेऊन माहिती दिली व गाव पातळीवर तसेच तालुका पातळीवर मला ऑर्डर मिळा लागली . आज माझे उत्पन्न जवळ जवळ 5-6 लाख रु आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | व्यवसाय उभारण्याची इच्छा तसेच उमेद अभियानने दिलेली संधी यामुळे मी स्वतःची उपजीविका निर्माण केली आहे. मी खूप खूप आभारी आहे . |


साईसागर
सेंद्रिय हळद पावडर
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर
Umed
जनसेवा फौंडेशन लोणी अंतर्गत
साई श्रमिक महिला बचत गट
Net Wet 250 gm
Price : 80/-
fssai No. 21518171001715
इतर उत्पादने : हळदीचे लोणचे
हळदीपासून बनविलेले कुंकू,
हळद दुध मसाला, हळदी पाक
ऑर्डर प्रमाणे कुरियर केले जाईल.
Best Before After 12 Month
Contact : Anita Ghogare : 8605888274, 8308949247
Sanjay Ghogare : 9881856065, 9881919248

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | रूपाली शरद मनकर,  दुर्गापूर , ता. राहाता जि .अहिल्यानगर |
| SHG चे नाव | तुलसी महिला  स्वयं  सहाय्यता समूह   **(कृषी सेवा केंद्र )** |
| उमेद कडून आर्थिक मदत | १५००० रुपये RF घेऊन तसेच बँक कर्ज 30000 रुपये. व CIF ६००००  मिळाले |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | मी गटात येण्यापूर्वी माझी परिस्थिती खूप हलाकीची  होती आम्ही थोडीशी शेती व दोन छोट्या गाई सांभाळून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होतो त्यातून मिळणाऱ्या पैशात आम्ही कुटुंबाच्या गरजा जेमतेम भागविण्याचा प्रयत्न करत होतो नंतरमी उमेद अभियानात आल्यानंतर माझ्या मनात काहीतरी व्यवसाय करण्याची इच्छा आली म्हणून मी गटातून अंतर्गत कर्ज घेतले त्यातून दुकान उभारणीचा प्रयत्न केला नंतर दुकान कशाचे उभारायचे म्हणून शेतीविषयक अनेक शेतकऱ्यांना अडचणी असतात शेतीची औषधे बी बियाणे आणण्यासाठी दूरवर जाण्यापेक्षा गावातच जर आपण त्यांच्या सुविधा ठेवल्या तर उत्तम होईल असे वाटले. |

| | |
|---|---|
| व्यवसायातून केलेली प्रगती<br>(विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | आराध्या   नावाने कृषी सेवा केंद्र उभे केले व त्यामध्ये औषधे, बी बियाणे ,कीटकनाशके ,इत्यादी माल भरला शेतकऱ्यांना लांब जाऊन शेतीविषयक सामग्री खरेदी करण्यापेक्षा गावातूनच खरेदी करणे सोपे वाटू लागले त्यामुळे शेतकरी माझ्या दुकानात येऊन शेतीविषयक सामग्री खरेदी करत राहिले त्यामुळे माझे कृषी सेवा केंद्रची  चांगल्या प्रकारे विक्री होऊन माजे वार्षिक उत्पन्न ३-४ लाख पर्यंत होत होते विशेष म्हणजे महिला कृषि सेवा केंद्र चालवती  म्हटल्यावर गावातील बहुतांशी महिला कृषि संबंधी साहित्य नेहत आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | अभियानामुळे मला पाठबळ मिळाले , स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी उमेद अभियान खूप मोलाचे ठरले आहे , धन्यवाद... |


ReEarth
PRIVI
जिओक्झॉल.कॉम
चांगली माती · हिरवे पिक
Aradhya KSK
आराध्या कृषी सेवा केंद्र
प्रोप्रा. मनकर पाटील
9767156585
आराध्या कृषी सेवा केंद्र
रासायनिक खते बि-बियाणे किटकनाशक औषधांचे विक्रेते


KEM
DOMINANT
SAAF

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | सोनाली विशाल वाघ मु . पो . राजनखोल ता . राहता ,जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | सीतामाई महिला बचत गट **(नाणकटाई )** |
| उमेद कडून आर्थिक मदत | 15000 रुपये आला तो मी घेतला त्यामुळे मला व्यवसायात थोडीफार भर झाली नंतर गटाला सीआईएफ 60 हजार रुपये मिळाला व बँकेचे लोन भेटलेCIF व बँकेचे लोन 30 हजार रुपये घेऊन मी नानकटाई बनवण्यासाठी ओव्हन खरेदी केले मी बेकरी व्यवसाय स्वतःचा चालू केला. |
| व्यवसायाबाबत माहिती<br>(सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | या गावात एकूण 56 महिला बचत गट आहेत 2 ग्राम संघ आहे ज्ञानदीप आणि सुकन्या ग्राम संघ सुकन्या ग्राम संघात सीतामाई हा एक बचत गट आहे या गटाची स्थापना 24/9/2022 रोजी झाली गटात एकूण दहा महिला आहे. |

| | |
|---|---|
| व्यवसायातून केलेली प्रगती<br>(विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | व्यवसायातून घरी  मला ऑर्डर भेटू लागल्या जेथे बचत गटाचे स्टॉल लागतील तेथे मी घेऊन जाऊ लागले असे करता करता मला बाहेरून ऑर्डर मिळू लागल्या आता मी घरोघर जाऊन माल विकत नाही तर ऑर्डर घेऊन माल तयार करते व तो विकते माझे या उद्योगांमधून 2 लाख रुपये वार्षिक उत्पन्न आहे मी गटात आल्यामुळे आमच्या परिस्थितीत खूप बदल झाला आता माझा व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात चालू आहे उमेद च्या माध्यमातून मला खूप साहाय्य भेटले त्यामुळे मी उमेद ची खूप खूप आभारी आहे उमेद |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानामुळे मला एक नवी दिशा मिळाली.उमेदमुळे कुटुंबात एक आधारस्तंभ आहे. |




सितामाई महिला बचत गट
Umed
श्री स्वामी समर्थ बेकरी
उत्पादक : नानकटाई
सोनाली विशाल वाघ
Mo.8830745766,
8975910208
fssai Ref.No. 30240709117011315
पो.टिळकनगर, दत्तानगर, M.I.D.C. रोड


EQUIPMENTS

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | माधुरी गणेश कदम मु . पो . लोणी खुर्द तालुका. राहाता जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | साईसाक्षांक महिला स्वयं सहाय्यता समूह (Micron वस्तु ) |
| उमेद कडून आर्थिक मदत | खेळते भांडवल 15,000 रु व CIF 60,000 रु |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | सुरुवातीला इतर बचत गटाप्रमाणे अभियानच्या नियमाप्रमाणे बचतीचं काम करत होता. परंतु बचत गटांनी व्यावसायिक दृष्टिकोन जपावा हा उद्देश डोळयासमोर ठेवून विविध प्रकारचे प्रशिक्षण घेतले , वेगवेगळे प्रकारचे डिझाईन मी बनवायला सुरवात केली . |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | आज मी लोणी मध्ये दुकान चालू करून 1 वर्ष होत आहे , त्यातून माझे उत्पन्न जवळ -जवळ 2 ते 3 लाख पर्यन्त पोहच ले आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानाने मला सक्षम बनविले. |


Mehendi
realme
Shot on realme 8 5G
2024 12 26 19:58



360/-


| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | मंजुश्री राधाकिसन  गुळवे  , गोगलगाव  , तालुका . राहाता , जि . अहिल्यानगर |
| SHG चे नाव | कृषी कन्या महिला स्वयं सहाय्यता समूह  (दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क,  जीवामृत ) |
| उमेद कडून आर्थिक मदत | CIF  60000, व बँक कर्ज 50 हजार  . |
| व्यवसायाबाबत माहिती<br>(सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्यादी) | 11 एप्रिल 2019  पासून उमेद अभियान अंतर्गत गट स्थापन केला . आम्ही सेंद्रिय शेती करायचो ,  म्हणून असे लक्षात आले की  शेतकरी महिलांसाठी दशपर्णी अर्क, , निंबोळी अर्क  हे  जैविक कीटक नाशक बनवाचे असे ठरवले व कृषी कार्यालयात भेट देऊन त्या व्यवसायची पूर्ण माहिती घेतली . जिल्हा स्तरावर प्रशिक्षण घेतले . |
| व्यवसायातून केलेली प्रगती<br>(विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | सुरुवातीच्या काळामध्ये आम्ही दशपर्णी अर्क व निंबोळी अर्क,  घरीच शेतामध्ये वापरायचं व आम्हाला त्यातून उत्पन्न खूप व्हायचे यामुळे हळूहळू शेतकरी वर्ग ते पीक बघण्यासाठी यायचे आणि  त्यांनी आम्हाला ऑर्डर देण्यास सुरुवात केली आज आम्ही गाव स्तरावर तसेच तालुकास्तरावर दशपर्णी अर्क आणि निंबोळी अर्क , जीवामृत कृषी सेवा केंद्र या वर पोहच करण्यास सुरवात झाली .  आज माझे वार्षिक उलाढाल 5-7 लाख पर्यंत आहे . |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेद अभियानाने मला एक नवीन दिशा दिलेली आहे. मी उमेद अभियानाचे खूप खूप |






गुळवे पाटील नॅचरल फार्म

| | |
|---|---|
| महिलेचे नाव व पत्ता | अनिता विजय कातोरे मु.पो. निमगाव कोऱ्हाळे , ता. राहाता ,जि .अहिल्यानगर |
| SHG चे नाव | अन्नपूर्णा महिला स्वयं सहाय्यता समूह ( मूर्ती बनवणे ) |
| उमेद कडून आर्थिक मदत | बँक कर्ज 50 हजार व CIF 60000 मिळाला आहे . |
| व्यवसायाबाबत माहिती (सुरुवात, भांडवल, प्रशिक्षण इत्त्यादी) | मी अन्नपूर्णा समूहामध्ये असून माझा मूर्ती बनवण्याचा व्यवसाय आहे मी गटातून कर्ज घेऊन मूर्ती बनवण्याचा व्यवसाय चालू केला व त्यातूनच सुरवातीला मी लहान मूर्ती बनवायचे व शिर्डी येथे दुकानात विक्री करण्यात यायची नंतर मी त्या मध्ये बदल घडून विविध प्रकारचे मूर्ती बनववणे सुरू केले. |
| व्यवसायातून केलेली प्रगती (विक्री, सामाजिक स्थितीतील बदल) | आता मी छत्रपती शिवाजी महाराज, विठ्ठल रुक्मिणी, आंबेडकर व साई बाबा अशा वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती बनवण्याचे काम चालू केले व त्यानुसार ऑर्डर मोठ्या प्रमाणात मिळत आहे आणि गटातील माझ्याकडे 5-7 महिला काम करतात व आज मी या व्यवसाय मधून 2-3 लाख रु मला मिळकत राहते . |
| उमेद अभियानाबाबत मत | उमेदमुळे या व्यवसायाला एक प्रकरची ओळख निर्माण होऊन महिला मध्ये जाणीव जागृती झाली व महिला एकत्र येऊ लागल्या आणि तसेच आम्हांला समाजात एक मानाचे स्थान मिळाले . |





